RNI No. MAHBIL/2009/35529

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक १२] गुरुवार ते बुधवार, मार्च २४-३०, २०२२/चैत्र ३-९, शके १९४४ [पृष्ठे ३२ किंमत रुपये : १४.००

## उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी पनवेल यांजकडून

### अधिसूचना

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम क्र. ११.**

क्र. भूसंपादन/कात-५/सीआर/६५८/२०२२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त अधिसूचना ” असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त जमीन ” असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश “ सार्वजनिक प्रयोजन ” असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती कारणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश “ उक्त नियम ” असा करण्यात आला आहे) नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. .

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी पनवेल, उप विभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

### जमिनीचे वर्णन

गाव :- पेंधर, तालुका :- पनवेल, जिल्हा :- रायगड

| अनुक्रमांक | गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | ९७ | ०.०५.४० |
| २ | ९९ | ०.३२.६० |
| | **एकूण क्षेत्र . .** | **०.३८.००** |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| अधिसूचना प्रकल्पाचे नाव | . . | मौजे- पेंधर, ता. पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पासाठी दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उड्डाण पूल (ROB) बांधणेच्या प्रयोजनासाठी. |
| निर्गमित प्रकल्पकार्याचे वर्णन | . . | मौजे-पेंधर, ता. पनवेल येथील नवी मुंबई कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व्हे नं.९७, क्षेत्र ०.५.४० हे.आर व सर्व्हे नं. ९९, क्षेत्र ०.३२.६० हे.आर. जमीन, मौजे-तळोजे (पाचनंद), येथील १२.५% योजनाक्षेत्र व मौजे-खारघर, ता.पनवेल येथील नोड ही क्षेत्रे जोडण्यासाठी दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर उड्डाण पुलाचे (ROB) बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे. |
| करण्यापूर्वी समाजाला मिळणारे लाभ | . . | नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्त्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे प्रवास जलद गतीने व सुखकर होण्यासाठी उड्डाण पूल बांधणे आवश्यक आहे. * * * येथे मजकूर भरावा (आर्थिक रोजगार, पायाभूत, सुविधा, सोयीसुविधा व इतर लाभासंबंधात) |

## अनुसूची-तीन

| | | |
|---|---|---|
| बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे | . . | निरंक |

## अनुसूची-चार

### सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

मौजे-पेंधर, ता. पनवेल येथे उड्डाण पूल बांधल्यास नवी मुंबई शहराची वाढ व विस्तार बघता नवी मुंबई प्रकल्पासाठी दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उड्डाण पूल (ROB) बांधणे आवश्यक आहे.

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील . . निरंक

**राहुल मुंडके,**
उप विभागीय अधिकारी पनवेल,
उप विभाग, पनवेल.

पनवेल,
दिनांक १७ मार्च २०२२.